रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे २०, १९९९/वैशाख ३०, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

टीप.––प्रत्येक अधिसूचनेच्या आणि डावीकडील कोपऱ्यात जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मे १९९९

### अधिसूचना

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८

**१६०**

क्र. विनोंका १०९९-सीआर-११७/कु.क. ३.––महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८ (१९९९ चा महाराष्ट्र अधिनियम २०) याच्या कलम १९ च्या पोट-कलम (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे विवाह मंडळांचे विनियमन करण्यासाठी आणि विवाह नोंदणीसाठी पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव.**––या नियमांना महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम, १९९९ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**––या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,––

(अ) " नमुना " म्हणजे या नियमांना जोडलेला नमुना ;

(ब) " विधेयक " म्हणजे महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी विधेयक, १९९८ ;

(क) " कलम " म्हणजे विधेयकाचे कलम ;

(ड) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना विधेयकामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

३. **विवाह मंडळाच्या नोंदणीसाठी अर्ज.**—(१) एखाद्या विवाह मंडळाचा प्रत्येक मालक, व्यवस्थापक, भागीदार, विश्वस्त किंवा प्रभारी व्यक्ती किंवा एखादे विवाहमंडळ चालवू इच्छिणारी किंवा चालविणारी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट, ज्या निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात ते मंडळ असेल किंवा होणार असेल त्या निबंधकाकडे नमुना " अ " मध्ये मंडळाच्या नोंदणीसाठी अर्ज करील.

(२) पोट-नियम (१) खालील अर्जासोबत रु. ५,००० एवढी फी देण्यात येईल.

(३) अर्जासोबत पुढील दस्तऐवज असतील :—

(एक) मंडळ एक विश्वस्त संस्था असेल तर विश्वस्त विलेखाची एक प्रत.

(दोन) भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या, कोणत्याही ओळखपत्राची प्रत असल्यास, किंवा शिधापत्रिका किंवा अर्जदाराची ओळख पटविणारा आणि अर्जदाराच्या वास्तव्याच्या ठिकाणाचा आणि मंडळाचे नोंदणीकृत कार्यालय म्हणून विवाह मंडळाचे कार्यालय जेथे असेल त्या कार्यालयाच्या ठिकाणाचा निःसंशय पुरावा देणारा इतर कोणताही दस्तऐवज :

परंतु, निबंधकास, त्याच्या स्वेच्छानिर्णयाने अर्जदाराची ओळख पटविण्यासाठी, पुरेसा पुरावा म्हणून आणि निवासाचा आणि अशा मंडळाच्या कार्यालयीन जागेचा पुरावा म्हणून अर्जासोबत इतर कोणताही दस्तऐवज सादर करण्यास मुभा देता येईल.

(४) पोट-नियम (३) अन्वये देण्यात आलेले दस्तऐवज अर्जदाराची ओळख पटविण्यास किंवा अर्जदाराच्या निवासाचे ठिकाण किंवा मंडळाचे नोंदणीकृत कार्यालय म्हणून मंडळाचे कार्यालय जेथे असेल ते ठिकाण असल्याचे सिद्ध करणारा निःसंशय पुरावा नाही असे निबंधकाचे मत असेल तर, नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी निबंधकाची खात्री होण्याच्या प्रयोजनासाठी निबंधकास आवश्यक वाटेल, अशी इतर कागदपत्रे किंवा दस्तऐवज पुरविण्यासाठी निबंधकास अर्जदाराला निदेश देता येईल. अशी अतिरिक्त कागदपत्रे किंवा दस्तऐवज दाखल केल्यावर निबंधकाची खात्री पटल्यास निबंधकास एक विवाह मंडळ म्हणून अशा मंडळाची नोंदणी करता येईल आणि नमुना " ब " मध्ये नोंदणी प्रमाणपत्र देता येईल.

(५) अर्जदाराच्या ओळखीबद्दल किंवा अशा मंडळाच्या कार्यालयीन जागेबद्दल निबंधकाची खात्री पटली नसेल त्या बाबतीत, निबंधकास अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि नाकारण्यासंबंधीची कारणे लेखी नमूद केल्यानंतर, मंडळाची नोंदणी करण्यास नकार देणारा आदेश नमुना " क " मध्ये काढता येईल.

(६) पोट-नियम (४) अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या एखाद्या विवाह मंडळाच्या नोंदणीचे तशाच प्रकारे नविनीकरण करता येईल.

४. **नोंदणी रद्द करणे.**––विधेयकाच्या किंवा नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही विवाह मंडळाची कामे करण्यात येत आहेत. असे निबंधकास कळविण्यात आले असेल किंवा निदर्शनास आले असेल तर, अशा मंडळास कारण दाखविण्याची आणि/किंवा त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्यानंतर अभिकथित नियमबाह्यतेबद्दल किंवा विधेयकाच्या किंवा नियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल खात्री करून घेतल्यानंतर निबंधकास कारणे, लेखी नमूद केल्यानंतर अशा मंडळाची नोंदणी रद्द करणारा नमुना " क " मधील आदेश काढता येईल.

५. **विवाह नोंदणीची कार्यपद्धती.**––(१) विवाह नोंदणीचे प्रत्येक ज्ञापन नमुना " ड " मध्ये असेल.

(२) ज्ञापनासोबत रु. १५ एवढी फी देण्यात येईल.

(३) ज्ञापनासोबत पुढील दस्तऐवज असतील :––

(एक) शिधापत्रिकेची प्रत किंवा भारताच्या निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेले कोणतेही ओळखपत्र असल्यास किंवा पक्षकार आणि साक्षीदार यांचे मालक इत्यादीकडून देण्यात आलेले पारपत्र किंवा ओळखपत्र इत्यादीसारखे कोणतेही इतर दस्तऐवज.

(दोन) पक्षकारांचे जन्म प्रमाणपत्र, किंवा शाळा सोडल्याचा दाखला.

(तीन) लग्नाची निमंत्रणपत्रिका, असल्यास :

परंतु, निबंधकास, त्याच्या स्वेच्छानिर्णयाने, पक्षकारांची आणि साक्षीदारांची ओळख आणि निवासस्थान निःसंशयपणे सिद्ध करण्यासाठी पुरेसा पुरावा म्हणून ज्ञापनासोबत कोणतेही इतर दस्तऐवज सादर करण्याची मुभा देता येईल.

(४) ज्ञापन सादर केल्यावर आणि त्याची पडताळणी केल्यानंतर आणि पक्षकार व साक्षीदार यांच्या ओळखीबद्दल खात्री करून घेतल्यानंतर, निबंधकास, नमुना " इ " मध्ये विवाह नोंदणीचे एक प्रमाणपत्र देता येईल.

(५) निबंधकाच्या मते ज्ञापनामध्ये देण्यात आलेला तपशील आणि पक्षकारांनी आणि साक्षीदारांनी सादर केलेले दस्तऐवज आणि कागदपत्र पक्षकारांची किंवा साक्षीदारांची किंवा दोघांचीही ओळख निःसंशयपणे शाबीत करू शकत नाहीत तर, निबंधकास, नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी निबंधकाकडून आवश्यक ठरविण्यात येतील असे दस्तऐवज किंवा कागदपत्रे पुरविण्याचा, पक्षकारांना वाजवी वेळ देऊन, पक्षकारांना निदेश देता येईल. अशी कागदपत्रे आणि दस्तऐवज पुरविण्यात आल्यानंतर, अशा दस्तऐवजांची किंवा कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर, खात्री करून घेऊन निबंधकास, नमुना " इ " मधील विवाह नोंदणी प्रमाणपत्र देता येईल.

(६) पक्षकारांच्या किंवा साक्षीदारांच्या ओळखीबद्दल किंवा ज्ञापनामध्ये देण्यात आलेल्या निवेदनाच्या अचूकपणाबद्दल निबंधकाची खात्री पटली नसेल त्या बाबतीत, निबंधकास, पक्षकारांचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर आणि कारणे लेखी नमूद केल्यानंतर, विवाहाची नोंदणी करण्यास नकार देणारा आदेश काढता येईल. नकाराचा आदेश नमुना " फ " मध्ये असेल.

६. **अपील (निर्देश) मिळाल्यानंतरची कार्यपद्धती.**––नोंदणी करण्यास नकार देण्याच्या आदेशासंबंधी निबंधकाकडून, विधेयकाच्या कलम ७ (२) अन्वये निर्देश मिळाल्यानंतर, महानिबंधक, सात दिवसांच्या आत बाधा पोहोचलेल्या पक्षकारांना त्यांची बाजू स्पष्ट करण्यासाठी नोटीस दिल्याच्या तारखेपासून सात दिवसांपेक्षा आधीची नसलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेत व वेळी त्यांना त्यांच्यासमोर हजर होण्यास फर्माविणारी एक नोटीस नमुना "ग" मध्ये पाठवील.

७. **नोंदणीच्या विलंबाबद्दल शास्ती.**––(१) शास्त्रोक्त पद्धतीने केलेल्या परंतु शास्त्रोक्त केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत नोंदणी न केलेल्या विवाहाची, ते पक्षकार सर्वसाधारणपणे ज्या निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात रहात असतील त्या निबंधकाकडून, रुपये पन्नास एवढी शास्ती भरल्यानंतर, नोंदणी करता येईल, आणि नियम ५ खालील विवाह नोंदणीच्या संबंधातील कार्यपद्धती अशा नोंदणीस लागू होतील.

(२) विवाह शास्त्रोक्त पद्धतीने केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीनंतर सादर करण्यात आलेली विवाह नोंदणीसंबंधीच्या ज्ञापनाची शंभर रुपये शास्ती भरल्यानंतर नियम ५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोंदणी करता येईल.

८. **निबंधकाने सर्व अर्ज आणि ज्ञापने सुरक्षित अभिरक्षेत ठेवणे.**––निबंधक एखाद्या विवाह मंडळाच्या नोंदणीचा किंवा नविनीकरणाचा प्रत्येक अर्ज आणि त्याला मिळालेले प्रत्येक ज्ञापन सुरक्षित अभिरक्षेत ठेवील असा अर्ज किंवा ज्ञापन ते मिळाल्याच्या तारखेपासून साठ वर्षाच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल आणि एखाद्या न्यायालयाचा लेखी आदेश असल्याखेरीज ते त्याच्या कार्यालयातून हलविण्यात येणार नाही.

९. **नोंदवहीचा नमुना.**––(१) निबंधक विवाह मंडळाची प्रत्येक वर्षाची नोंदवही नमुना "ह" मध्ये ठेवील.

(२) निबंधक प्रत्येक वर्षाची विवाह नोंदवही नमुना "ई" मध्ये ठेवील.

१०. **प्रमाणित प्रत दाखल करून घेणे.**––(१) हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) अन्वये करण्यात आलेले हिंदू विवाह व घटस्फोट नियम, १९५५ याच्या नियम (२२) अन्वये घटस्फोटाच्या प्रत्येक हुकूमनाम्याची, विवाह शून्यवत केल्याच्या किंवा विवाह विघटनाच्या प्रत्येक हुकूमनाम्याची निबंधकास मिळालेली प्रत्येक प्रत त्याच्याकडून विवाह नोंदवहीमध्ये दाखल करण्यात येईल आणि असा विवाह या अधिनियमान्वये नोंदविण्यात आलेला असेल तर अशा हुकूमनाम्याची नोंद समुचित ठिकाणी घेण्यात येईल.

(२) प्रत्येक महिन्याच्या पाचव्या दिवशी किंवा तत्पूर्वी निबंधक, पुढील नमुन्यामध्ये प्रमाणित प्रतीमधील उतारा महानिबंधकास नोंदणीकृत डाकेने पाठवील.

" घटस्फोट किंवा विवाह शून्यवत करणे किंवा विवाहाचे विघटन करण्याच्या हुकूमनाम्याच्या प्रमाणित प्रतीमधील उतारा "

| पतीचे नाव | निवासाचे ठिकाण | पत्नीचे नाव | निवासाचे ठिकाण | विवाहाचे ठिकाण व तपशील | हुकूमनाम्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

विवाह निबंधक.

दिनांक :

११. **नोंदवह्यांची तपासणी आणि त्यांच्या प्रमाणित प्रती मिळविणे.**––(१) सर्व जनतेला पाहण्यासाठी नोंदवह्या खुल्या ठेवण्यात येतील. नोंदवही (तपासण्यासाठी) पाहण्यासाठी इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या बाबतीत निबंधकाकडे अर्ज केल्यावर आणि पाच रुपये फी भरल्यावर ती पहाता येईल.

(२) नोंदवहीच्या उताऱ्याची प्रमाणित प्रत मिळविण्यास इच्छुक असलेली कोणतीही व्यक्ती त्यासाठी अर्ज करील आणि प्रत्येक प्रतीसाठी निबंधकाकडे रुपये दहा एवढी फी भरील.

१२. **फी जमा करणे.**––निबंधकाकडे आलेली सर्व फी आणि शास्ती यांची रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

१३. **ज्ञापनाचे नमुने पुरविणे.**---(१) ज्ञापनाचे कोरे नमुने निबंधकाकडून विवाहाच्या पक्षकारांना विनामूल्य पुरविण्यात येतील.

(२) निबंधक कोणत्याही पुरोहितास, तलाठ्यास, पाटलास, शालेय शिक्षकास किंवा कोणत्याही नगरपरिषदेस किंवा महानगरपालिकेस कोरे नमुने वाजवी संख्येत विनामूल्य पुरवू शकेल. मात्र असा पुरोहित, तलाठी, पाटील, शालेय शिक्षक, नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांनी अशा नमुन्यांचा आणखी पुरवठा करण्यासाठी विनंती करताना नमुन्यांचा हिशेब देण्याची हमी दिली पाहिजे.

१४. **नोंदवह्या आणि अभिलेख यांचे जनत करणे.**---(१) खाली नमूद केलेले अभिलेख आणि कागदपत्रे त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात येतील.

| अभिलेखाचे नाव | | कालावधी (वर्षांमध्ये) |
|---|---|---|
| (अ) पावती पुस्तक | .. | पाच |
| (ब) महानिबंधकांना पाठविलेल्या निर्देशांच्या संबंधातील टपाली पोच पावत्या. | | पाच |
| (क) नोंदवहीमधील उताऱ्यासाठीचे अर्ज | .. | पाच |
| (ड) रोकड वही | .. | पाच |
| (इ) कोरी पुस्तके आणि नमुने यांचे हिशेब | .. | तीन |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रंजना सिन्हा,**
आयुक्त व पदसिद्ध सचिव,
(कुटुंब कल्याण).

नमुना '' अ ''

विवाह मंडळाची नोंदणी/नोंदणीचे नविनीकरण याकरिता अर्ज

[पहा कलम ५ (१) आणि (४) आणि नियम ३]

द्वारा :

(अर्जदाराचे नाव आणि पत्ता)

............................................  ............................................

............................................  ............................................

............................................  ............................................

(कायमचा पत्ता)  (सध्याचा पत्ता)

प्रति

निबंधक,
विवाह मंडळ आणि विवाह नोंदणी,
______________

महोदय,

मी, उपरिनामीत अर्जदार विवाह मंडळाच्या नोंदणीकरिता/नोंदणीच्या नविनीकरणाकरिता अर्ज करू इच्छितो,

जे म्हणजे—

विवाह मंडळाचे नाव आणि पूर्ण पत्ता . .

(मंडळाचे नोंदणीकृत कार्यालय ज्या ठिकाणी असेल किंवा होणार असेल ते ठिकाण)

२. मी खालील दस्तऐवज जोडत आहे :—

(एक) ............................................

(दोन) ............................................

(तीन) ............................................

ज्या अटींच्या व शर्तींच्या अधीन नोंदणी करण्यात येईल त्या सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला बंधनकारक असतील यास मी/ आम्ही वचनबद्ध आहे/आहोत.

ठिकाण : आपला विश्वासू,

दिनांक : (अर्जदाराची सही)

नमुना '' ब ''

विवाह मंडळ नोंदणीचे/नोंदणीच्या नविनीकरणाचे प्रमाणपत्र

[पहा कलम ५ (२) आणि (४) आणि नियम ३]

प्रमाणित करण्यात येते की नमुना '' अ '' मध्ये सादर केलेल्या अर्जानुसार श्री. ..................................
रा. .................................................. यांच्या ..................... येथे नोंदणीकृत कार्यालय असलेल्या (नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता) विवाह मंडळाची महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन व विवाह नोंदणी विधेयक, १९९८ मधील तरतुदीनुसार आणि मागील पानावरील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून माझ्याकडून नोंदणी करण्यात आलेली आहे.

हे प्रमाणपत्र ...................................... १९      पर्यंत ग्राह्य आहे.

.............................. विवाह मंडळाचे .............................. चे नोंदणीकृत कार्यालय,

मोहोर

ठिकाण :                                                                 सही

दिनांक :                    (अटी आणि शर्ती)

या प्रमाणपत्राचे .......................................... पर्यंत नविनीकरण करण्यात आलेले आहे.

मोहोर

दिनांक :                                                                 सही

ठिकाण :

नमुना '' क ''

[कलम ५ (६) आणि आणि नियम ३ (५)]

**विवाह मंडळाची नोंदणी/नोंदणीचे नविनीकरण करण्यास नकार देणारा आदेश**

मी, विवाह मंडळाचा निबंधक ........................................................................ अर्जाची आणि त्यासोबत सादर केलेल्या इतर दस्तऐवजांची आणि कागदपत्रांची छाननी केल्यानंतर आणि अर्जदाराचे म्हणणे दिनांक / /१९ रोजी ऐकून घेतल्यानंतर सदर विवाह मंडळाची नोंदणी करण्यास नोंदणीचे नविनीकरण करण्यास खालील कारणास्तव नकार देत आहे :—

..........................................................................................................................

..........................................................................................................................

दिनांक : (मोहोर) विवाह मंडळांचे प्रबंधक.

नमुना ''ड''

विवाहाचे ज्ञापन

[पहा कलम ६ आणि नियम ५]

१. विवाहाचा दिनांक : ..................

२. विवाहाचे ठिकाण : ..................
(संपूर्ण तपशीलासह)

३. पक्षकारांमधील विवाह ज्या व्यक्तीगत : ..................
कायद्यान्वये विधी संपन्न झाला. ..................

४. (अ) पतीचे नाव : ..................
(प्रथम आडनावासह पूर्ण नाव)

(ब) पतीला दुसऱ्या नावाने (कोणतेही असो) : ..................
ओळखत असल्यास ते नाव/ती नावे. ..................

(क) धर्म (एक) जन्माने
(दोन) दुसरा धर्म स्वीकारला
असल्यास (कोणताही असल्यास)

(ड) विवाह विधी ज्या तारखेस संपन्न झाला असेल त्या तारखेस असलेले वय. वर्ष महिना

(इ) व्यवसाय कार्यालयाच्या पत्त्यासह : ..................

(फ) विवाहाच्या वेळची स्थिती : अविवाहित/विधुर/घटस्फोटित

(ग) पतीचा पूर्ण पत्ता : ..................

(ह) पतीची दिनांकासह सही : ..................

५. (अ) पत्नीचे नाव (लग्नापूर्वीचे नाव) : ..................
प्रथम आडनावासह पूर्ण नाव : ..................

(ब) पत्नीला दुसऱ्या नावाने (कोणतेही असल्यास) : ..................................

ओळखत असल्यास ते नाव/नावे : ..................................

(क) धर्म (१) जन्माने ..................................

(२) दुसऱ्या धर्म स्वीकारला असल्यास ..................................
(कोणताही असल्यास)

(ड) विवाह विधी ज्या तारखेस संपन्न झाला वर्ष महिना
असेल त्या तारखेस असलेले वय.

(इ) विवाहाच्या वेळची स्थिती : अविवाहित/विधवा/घटस्फोटित

(फ) विवाहाच्या पूर्वीचा अथवा ..................................

विवाहाच्या वेळचा पत्नीचा ..................................

पूर्ण पत्ता : ..................................

(ह) पत्नीची दिनांकासह सही : ..................................

६. साक्षीदार.—(एक) नाव : ..................................

(दोन) पत्ता : ..................................

(तीन) व्यवसाय आणि कार्यालयाचा पत्ता : ..................................

(चार) विवाहीत जोडप्याशी असलेले नाते : ..................................
(कोणतेही असल्यास)

(पाच) दिनांकासह सही : ..................................

(२) (एक) नाव : ..................................

(दोन) पत्ता : ..................................

(तीन) व्यवसाय आणि कार्यालयाचा पत्ता : ..................................

(चार) विवाहित जोडप्याशी असलेले नाते : ..................................
(कोणतेही असल्यास)

(पाच) दिनांकासह सही

(३) (एक) नाव : ..................................

(दोन) पत्ता : ..................................

(तीन) व्यवसाय आणि कार्यालयाचा पत्ता : ..........................................

(चार) विवाहित जोडप्याशी असलेले नाते : ..........................................
(कोणतेही असल्यास)

(पाच) दिनांकासह सही : ..........................................

(७) पुरोहित: (अ) पुरोहिताचे नाव : ..........................................

(ब) पूर्ण पत्ता : ..........................................

(क) धर्म : ..........................................

(ड) वय : ..........................................

(इ) दिनांकासह सही : ..........................................

(८) या ज्ञापनासह सादर केलेले दस्तऐवज--
(१) ..........................................
(२) ..........................................
(३) ..........................................
(४) ..........................................

(९) निबंधकाकडे सादर केल्याचा दिनांक : ..........................................

टीप.--कोणत्याही व्यक्तीने ज्ञापनामध्ये केलेले कोणतेही विधान अथवा प्रतिज्ञापन जे विशेष महत्त्वाचे बाबतीत खोटे असेल अथवा सादर केलेले कोणतेही दस्तऐवज जे खोटे असल्याचे त्याला/तिला माहीत असेल अथवा जे खोटे असल्याचे मानण्यास कारण असेल, तो/ती व्यक्ती कलम १२ खाली दंडनीय कारवाईस पात्र ठरेल.

नमुना "इ"

विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र

[पहा कलम ६ (१) आणि नियम ५]

प्रमाणित करण्यात येते की, पतीचे नाव : ..............................................................

राहणार .............................................. आणि पत्नीचे नाव ..............................................

राहणार .............................................. यांचा विवाह दिनांक ........................ रोजी ........................

(ठिकाणी) येथे विधीसंपन्न झाला, त्याची महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी विधेयक, १९९८ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीच्या खंड क्रमांक ........................ च्या अनुक्रमांक ........................ वर दिनांक ........................ रोजी माझ्याकडून नोंदणी करण्यात आली आहे.

ठिकाण :

दिनांक :

मोहोर

सही

विवाह निबंधक.

नमुना ''फ''

[पहा कलम ७ आणि नियम ६ (६)]

**एखाद्या विवाहाच्या नोंदणीचा नकार आदेश**

मी, विवाह निबंधक ..........................................................................................................

ज्ञापनाची आणि ज्ञापनासोबत सादर केलेल्या इतर दस्तऐवजांची छाननी केल्यानंतर आणि पक्षकारांचे म्हणणे दिनांक .................................. रोजी ऐकून घेतल्यानंतर, विवाहाच्या नोंदणीस खालील कारणास्तव नकार देत आहे :—

.................................................................................................................................

.................................................................................................................................

ठिकाण :

दिनांक :

मोहोर

सही

विवाह निबंधक.

नमुना ''ग''

[पहा कलम ७ (२) आणि नियम ६ ]

नोंदणीकृत डाकेने

दिनांक : / /१९

द्वारा

महानिबंधक,

विवाह मंडळ विनियमन व विवाह नोंदणी,

महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय.**—महाराष्ट्र विवाह मंडळ विनियमनाच्या आणि विवाह नोंदणी विधेयक, १९९८ च्या कलम ७ (२) च्या अंतर्गत निबंधक ..................................

(ठिकाण) यांच्याकडील संदर्भ.

प्रति

(१) पतीचे नाव : ..................................

(पत्ता) ..................................

(२) पत्नीचे नाव : ..................................

(पत्ता) ..................................

(३) साक्षीदाराचे नाव : ..................................

(पत्ता) ..................................

(४) साक्षीदाराचे नाव : ..................................

(पत्ता) ..................................

(५) साक्षीदाराचे नाव : ..................................

(पत्ता) ..................................

ज्याअर्थी निबंधक, विवाह मंडळ आणि विवाह .............................. (ठिकाण) यांनी .................... (पती) आणि ............................................ (पत्नी) या दोघांच्या ............................ या ठिकाणी विधी संपन्न झालेल्या विवाह नोंदणीस नकार दर्शविला आणि महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी विधेयक, १९९८ (१९९८ चा महाराष्ट्र विधेयक क्र. ..............................) कलम ७ च्या तरतुदीनुसार माझ्याकडे एक संदर्भ केला आहे ;

त्याअर्थी आता उक्त विधेयकाच्या कलम (८) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून निबंधकांनी दिलेला आदेश कायम करण्यात येऊ नये. याची कारणे देण्याकरिता, मी याद्वारे ................................................ या दिवशी ................................................ वाजता मध्यान्हपूर्व/मध्यान्होत्तर खालील पत्त्यावर माझ्या समक्ष उपस्थित राहण्यास फर्मावित आहे.

२. आपल्या दाव्यास पुष्टी देण्यासाठी, आपण आपल्याला दिलेल्या दिनांकाला, वेळेला व ठिकाणी अतिरिक्त दस्तऐवज आणि साक्षीदार आणू शकता.

३. ठरल्यानुसार आपण उपस्थित न राहिल्यास, त्याविषयी आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल व महानिबंधक योग्य ते आदेश देतील.

दिनांक : / /१९

सही

महानिबंधक.

नमुना ''ह''

विवाह मंडळांची नोंदवही

[पहा कलम ५ (२) आणि नियम ९]

.................................... या वर्षाची विवाह मंडळाची नोंदवही.

| अनुक्रमांक | मंडळाचे नाव आणि पत्ता | मंडळ चालविणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि पत्ता |
|---|---|---|
| | | |

नमुना ''आय''

विवाह नोंदवही

[पहा कलम ६ (१) (इ), ८ आणि नियम ९ ]

.................................................. सालाकरिता विवाह नोंदवही

| अनु-क्रमांक | विवाहाचा दिनांक आणि ठिकाण | पतीचे नाव आणि त्याचा पत्ता | विवाहाच्या वेळचे त्याचे वय | पतीचा धर्म | पत्नीचे नाव आणि तिचा पत्ता | विवाहाच्या वेळचे तिचे वय | पत्नीचा धर्म | नोंदणीचा दिनांक | अभि-प्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | | | | | | |

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032

Dated the 15th May 1999.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGULATION OF MARRIAGE BUREAUS AND REGISTRATION OF MARRIAGES ACT, 1998.

No. VINOKA. 1099/CR-117/FW-III.—In exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 19 of the Maharashtra Regulation of Marriage Bureaus and Registration of Marriages Act, 1998 (Mah. Act XX of 1999), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules for regulation of the marriage bureaus and registration of marriages, as follows namely :—

1. *Short Title*.—These rules may be called the Maharashtra Regulation of Marriage Bureaus and Registration of Marriages Rules, 1999.

2. *Definitions*.—In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) " Form " means a form appended to these rules;

(*b*) " Act " means the Maharashtra Regulation of Marriage Bureaus and Registration of Marriages Act, 1998;

(*c*) " section " means a section of the Act;

(*d*) words and expressions used but not defined herein shall have the respective meanings assigned to them in the Act.

3. *Application for registration of marriage bureau*.—(1) Every owner, manager, partner, trustee or a person-in-charge of a marriage bureau or any person or group of persons desirous of conducting or running a marriage bureau shall apply for registration of the bureau in Form ' A ' to the Registrar, within whose local jurisdication the Bureau is or is to be situated.

(2) The application under sub-rule (1) shall be accompanied by a fee of rupees 5,000.

(3) The application shall be accompanied by the following documents, namely :—

(*i*) a copy of the trust deed, in case the bureau is a trust;

(*ii*) a copy of the identity card, if any, issued by the Election